# कल्याण महानगरपालिका, कल्याण.

आवक क्रमांक/कमपा/नरवि/बां प./ ऽ३ डोंबिवली
१९८-८५
कल्याण महानगरपालिका कार्यालय, कल्याण
दिनांक : ९।५।८८

श्री/श्रीमती मनोरमा वसंतराव नागवेकर व अन्य.
(यांचे कुलमुखत्यारधारक – श्री. चंद्रकांत आर. पाटील,)
द्वारा. श्री. दिलीप देशमुख (वास्तुशिल्पकार) डोंबिवली (पू)

विषय : स. नं / ७७७ अ सि. स नं, हि. नं. ३७ (पैकी)
प्लॉट नं, मौजे चोळे. येथे बांधकाम करण्याच्या मंजुरी बाबत.
संदर्भ : आपला दि. १५-३-८८ चा
श्री. दिलीप देशमुख,

वास्तु शिल्पकार यांचे मार्फत सादर केलेला अर्ज.
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये
सि. स. नं स. नं ७७७ अ हि नं.
३७ (पैकी) प्लॉट नं. मौजे चोळे. मध्ये ८८८.८० [illegible]

चौ. मि. भूखंडाच्या विकास करावयास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दि. च्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे तळघर/स्टील्ट, तळमजला पहिला मजला व दुसरा मजला, तिसरा मजला, (चौथा) चौथा मजला रहाणेसाठी दुकाने / ऑफीस / दवाखाना / हॉस्पीटल / शाळेसाठी / गॅरेज वाढीव प्रतीच्या इमारतीच्या बांधकामा बाबत, बांधकाम परवाना/प्रारंभ प्रमाण पत्र देण्यात येत आहे.

: अटी :

१. ही बांधकाम परवानगी दिल्याचे तारखेपासुन एक वर्ष पर्यंत वैध असेल. नंतर पुढील वर्षासाठी परवानगीचे नुतनीकरण मुदत संपणे आधी करणे आवश्यक राहिल. अशा प्रकारचे नुतनीकरण फक्त तीन वर्ष करता येईल. वैध मुदतीत बांधकाम पूर्ण करणे आवश्यक आहे. नुतनीकरण करतांना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांच्या व नियोजित विकास आराखड्याच्या अनुषंगाने छाननी करण्यात येईल.

२ नकाशात रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.

३. मे जिल्हाधिकारी ठाणे, यांजकडून बांधकाम चालू करावयाचे अगोदर बिनशेती परवानगी घेण्याची जबाबदारी तुमच्यावर राहिल व बिन शेतीच्या परवानगीची एक सत्य प्रत काम सुरु करावयाचे पधरा (१५) दिवस अगोदर महानगरपालिकेकडे पाठविणे आवश्यक राहिल.

४. बांधकाम चालू करण्यापूर्वी (७) दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

५. ही परवानगी आपल्या मालकीच्या कबजातील जमीनी व्यतीरीक्त जमीनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.

६. बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशा प्रमाणे आणि घालून दिलेल्या अटीप्रमाणे करता येईल.

७. जोत्या पर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तु शिल्पकाराचे मंजूर नकाशा प्रमाणे बांधकाम केल्या बाबतचे प्रमाणपत्र, महानगरपालिकेस सादर करण्यात यावे व त्या नंतरच जोत्यावरील बांधकाम करावें.

८. प्लॉटचे हद्दीत इमारती भोवती मोकळ्या सोडावयाच्या जागेत बदल करु नये. व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.

९. बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये. तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची बांधकाम परवानगी रद्द झाली असे समजण्यात येईल.

१०. इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षितेची (स्ट्रकचरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्व आपल्या वास्तु शिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहिल.

११ बांधकाम पूर्णतेच्या दाखला वापर परवानगी घेतल्याशिवाय इमारतीचा वापर करु नये. त्यासाठी जागेवर ज्या प्रमाणे बांधकाम पूर्ण झाले आहे, त्याचा नकाशा वास्तु शिल्पकार व स्थापत्य विशारद यांच्या विहीत नमुन्यातील दाखल्यासह (३ प्रतीत) इतर आवश्यक कागद पत्रासह सादर करण्यात यावा.

१२. बांधकाम चालू करण्यापूर्वी नगर भूमापन अधिकारी/भूमी अभिलेख खात्याकडून जागेची आखणी करुन घेण्यात यावी.

१३. नकाशात दाखविलेल्या गाळ्यांच्या संख्येमध्ये व नियोजनामध्ये पूर्वपरवानगी शिवाय बदल करु नये

१४. नवीन इमारतीस मंजूर नकाशे प्रमाणे सेप्टीक टँक पाहिजे व संडास भविष्य काळात जवळच्या मलनिस्सरण नलिकेस स्वखर्चाने नगर अभियंता यांचे परवानगिने जोडणे आवश्यक राहिल सेप्टीक टँक विहीरी पासून कमीत कमी ५० फूट अंतरावर असणे आवश्यक आहे.

१५. सांडपाण्याचे व पावसाळ्याचे पाणी महानगरपालिकेच्या गटारांत स्वखर्चाने नगर अभियंता यांच्या पसंती प्रमाणे सोडावे लागेल. सांडपाण्याच्या बाबतीत आरोग्य खात्याचे प्रमाणपत्र असल्या शिवाय वापर परवाना देण्यात येणार नाही.

१६. बांधकामाचे मटेरीयल रस्त्यावर टाकावयाचे झाल्यास महानगरपालिकेच्या बांधकाम खात्याची परवानगी घेणे आवश्यक राहील व त्या करिता नियमाप्रमाणे लागणारी रक्कम ( व दंड झाल्यास त्या रकमेसहीत ) भरावी लागेल.

१७. बांधकामाच्या वेळी निरुपयोगी माल ( मटेरीयल ) महानगरपालिका सांगेल त्या ठिकाणी स्वखर्चाने वाहून टाकला पाहिजे.

१८. बांधकामाच्या सभोवताली सोडलेल्या खुल्या जागेत कमीत कमी १) अशोक २) गुलमोहर ३) चिंच ४) निलगिरी ५) करंज पैकी एकूण दहा झाडे लावून त्याची जोपासना केली पाहिजे तसेच सध्या अस्तीत्वात असलेली झाडे तोडण्यापूर्वी परवानगी घेणे बंधनकारक आहे.

१९. नकाशात दाखविल्याप्रमाणे बांधकामाचा फक्त राहण्यासाठी/वाणिज्य/शैक्षणिक/औद्योगिक उपयोग करावा.

२०. नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ मधील तरतुदी प्रमाणे जागा बाधीत होत असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलेवर राहिल.

२१. जागेतुन किंवा जागे जवळून अतिदाब विद्युतवाहिनी जात असल्यास बांधकाम करण्यापूर्वी संबंधीत खात्याकडून ना हरकत दाखला घेतला पाहिजे

२२. जागा महामार्ग किंवा रेल्वे मार्गास सन्मुख लागून किंवा जवळ असल्यास संबंधीत खात्याकडून बांधकाम करण्यापूर्वी ना हरकत दाखला घेतला पाहिजे

२३, बांधकामाकडे किंवा इमारतीकडे जाण्या येण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहिल. बांधकाम परवानगी नियोजित रस्त्याप्रमाणे दिली असल्यास त्या रस्त्याचे काम महानगरपालिकेच्या सोयी प्रमाणे व प्राधान्यते प्रमाणे केले जाईल. व तसा रस्ता होई पावेतो इमारतीकडे जाण्या येण्याच्या मार्गाची जबाबदारी सर्वस्वी आपली राहील,

२४. जागेत जुने भाडेकरु असल्यास त्यांच्या बाबत योग्य ती व्यवस्था करायची जबाबदारी मालकाची राहील व मालक भाडेकरु यामध्ये काही वाद असल्यास किंवा निर्माण झाल्यास त्याचे निकारण मालकाने करणे आवश्यक राहील व त्याबाबतीत महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

२५. सदर जागेतून पाण्याच्या नैसर्गीक निचरा होत असल्यास तो इकडील परवानगी शिवाय वळवू अथवा बंद करु नये

२६ सदर प्रकरणी चुकीची संपूर्ण माहिती दिली असल्यास सदर बांधकाम परवानगी रद्द करणेत येईल.

२७ सदर जागेत विहीर असल्यास ती इकडील परवानगीशिवाय बुजवू नये.

२८. बांधकाम पूर्ण झाल्यावर पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन मिळण्याकरिता महापालिकेवर जबाबदारी राहणार नाही किंवा पिण्याच्या पाण्यासाठी महापालिका हमी घेणार नाही.

२९ सदर जागेत बांधकाम करण्याबाबतचा पूर्वीचा परवाना असेल तर तो या द्वारे रद्द झाला असे समजण्यात यावे.

३०. गटाराचे व पावसाच्या पाण्याचा निचरा होणेकरिता महापालिकेचा गटारास जोडणेसाठी पक्क्या स्वरुपाची गटारे बांधावीत.

३१. बांधकामासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी नळाचे कनेक्शन मिळणार नाही त्यासाठी बोअरवेलचे काम करावे लागेल.

३२. भूखंडासमोरील रस्ता पक्क्या स्वरुपात तयार केल्याशिवाय वापर परवाना मिळणार नाही.

33. म.रा.वि.मं.कडून त्यांच्या कडून विजेचा पुरवठा घेण्यास काम न.हा. ही हरकत नाही.

34. वि.यो.च्या रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक—

बांधकाम परवानगी जागा मालकधारक ती जागा कब्जा.

पडताळून पहाणाऱ्याचीसही व हुद्दा [illegible]

सहाय्यक संचालक,
बांधकाम परवानगी मंजूर करणाऱ्याची सही व हुद्दा

प्रत :

१) वरीष्ठ नियोजक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, कल्याण.

२) उपआयुक्त / सहाय्यक आयुक्त कल्याण महानगरपालिका